तरुण भारत
Paschim Vidarbha | 2022-03-17 | Page- 3
epaper.tarunbharat.net

# अमरावतीचा सौरऊर्जा पॅनेल उत्पादनात सहभाग

## कंपनी स्थापन करून पाच युवकांची गगनभरारी

◆ अमरावती, १६ मार्च

देशात पारंपरिक ऊर्जेची मागणी वाढत असल्याने येणाऱ्या काळात अपारंपरिक ऊर्जा महत्त्वाची ठरणार आहे. भविष्यातील ही निकड लक्षात घेऊन अमरावती शहरातील मध्यमवर्गीय कुटुंबातील पाच युवकांनी एकत्र येत ईसीई इंडिया एनर्जी प्रा. लि. कंपनीची स्थापना केली व येथील औद्योगिक वसाहतीत सौरऊर्जा पॅनेलचे उत्पादन करणारा प्रकल्प उभारला आहे. या प्रकल्पाने देश व राज्य पातळीवर अल्पावधीतच नावलौकिक मिळविला आहे.

अमित अनंत आरोकार यांनी उपरोक्त संकल्पनेची मुहूर्तमेढ रोवली. अभियांत्रिकीचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी इतर विद्यार्थ्यांप्रमाणे पुणे, मुंबई येथे जाऊन नोकरी करण्यापेक्षा आपल्या जन्मभूमीतच स्वत:चा उद्योग उभारण्याचा विचार केला. सुरुवातीला त्यांनी इन्व्हर्टरचा व्यवसाय केला. त्यातून झालेला नफा सौरऊर्जेवर चालणारी उपकरणे बनविण्याच्या उद्योगात गुंतविला. त्याकरिता त्यांनी समीर काळे, श्रीकांत तिखिले, अनिकेत तोंडारे, सुरज गावंडे या जीवलग मित्रांना सोबत घेतले. ईसीई इंडिया एनर्जी प्रा. लि. नावाने कंपनी स्थापन केली. या कार्यासाठी त्यांना प्राचार्य डॉ. व्ही. टी. इंगोले यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनात त्यांनी सौरऊर्जा पॅनेल उत्पादन प्रकल्प उभारण्याचे काम २०१८ मध्ये हाती घेतले. सर्वप्रथम रस्ता सुरक्षेसाठी लागणारे सौरऊर्जेवरील सिग्नल लाईट (सोलर ब्लिंकर) तयार केले. या सिग्नल लाईटची गुणवत्ता व दर्जा पाहून आयआरबीने त्यांच्या अखत्यारीतील रस्त्यांसाठी लाईट तयार करण्याचे कंत्राट ईसीई इंडिया कंपनीला दिले. त्यानंतर सौरऊर्जा निर्मितीसाठी आवश्यक पॅनेलचे उत्पादन करण्याचा निर्णय कंपनीने घेतला. अभ्यासाअंती प्रकल्पासाठी यंत्रसामुग्री मागविली. कोरोना महामारीच्या संकटामुळे हा प्रकल्प तेव्हा सुरू करता आला नाही.


मध्यभागी अमित आरोकार, डावीकडून श्रीकांत तिखिले, समीर काळे तर उजव्या बाजूने अनिकेत तोंडरे व सूरज गावंडे

दुसऱ्या टाळेबंदीनंतर जुलै २०२१ पासून उत्पादन सुरू झाले. प्रकल्पातून आतापर्यंत ५० मेगावॅट ऊर्जेची निर्मिती होईल इतक्या सौर पॅनेलची निर्मिती झाली आहे. देशभरात अशा ३५० तर राज्यात ४ कंपन्या आहेत. विशेष म्हणजे केंद्र सरकारच्या नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने ईसीई कंपनीला प्रमाणित केले असून देशातील दहा नामांकित कंपनीच्या एएलएमएम यादीत स्थान दिले आहे. त्यामुळे कंपनीला देशभरात काम करण्याची संधी मिळणार आहे. आता वर्षाला १०० मेगावॅट ऊर्जा निर्मितीचा संकल्प असल्याचे व्यवस्थापकीय संचालक अमित आरोकार यांनी सांगितले.

### १४० जणांना रोजगार

ईसीई कंपनीत सध्या १४० जणांना रोजगार उपलब्ध झाला आहे. त्यामध्ये ४० महिला कर्मचारी आहेत. भविष्यात ५०० जणांना रोजगार देण्याचा मानस कंपनीचा आहे. कर्मचाऱ्यांच्या सोयीसुविधांकडे विशेष लक्ष देण्यात येते. ◀(*तभा वृत्तसेवा*)

### ...तरच भारत आत्मनिर्भर होईल

स्वत:चा उद्योग उभारून आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करू पाहणाऱ्या स्थानिक युवकांना उद्योग उभारण्यासाठी आवश्यक असणारे सर्व मार्गदर्शन देण्यासाठी आमची कंपनी काम करीत आहे. मराठी युवकांनी नोकरीच्या मागे न लागता स्वत:चा उद्योग सुरू करून इतरांनासुद्धा रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी अपेक्षा अमित आरोकार यांनी व्यक्त केली आहे. देशाला आत्मनिर्भर करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्होकल फॉर लोकल ही संकल्पना ठेवली आहे. त्यावर अधिक काम करण्याची गरज आहे. स्थानिक उत्पादनांना महत्त्व दिले तरच आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार होणार असल्याचे त्यांनी सांगितले.